माहिती अधिकार कायदा २००५ कलम १९ (१) नुसार अपील अर्ज



प्रति,
मा. [redacted]
अपिलीय प्राधिकारी
तथा [redacted] महापालिका सहाय्यक आयुक्त
औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका पुणे – ४११००५

१) अपीलकाराचे पूर्ण नाव : रमेश बाबोबा ठोसर

२) पूर्ण पत्ता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत औंध पुणे ८
मोबाईल नं. ९८२२४९०८५८

३) अपिल दाखल करण्याचा अंतिम दि. : १७-१०-२०१८

४) ज्या आदेश व पत्रावरून अपिल दाखल केले आहे त्याचा तपशिल : माहिती अधिकार पत्र क्र. म.न.पा औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालय क्र. ३३१७/२०१८

६) ज्या जन माहिती अधिकारी यांच्या विरुद्ध अपील असेल त्यांच्याबाबत तपशिल : श्री देवाराम तारजी परिहार झोपडी किंवा दुकान डॉ. आंबेडकर वसाहत येथे विक्री घेतलेल्या कागदपत्रांची माहिती मिळणे बाबत.

७. अपील दाखल करण्याचे कारण
१) माहिती देण्यास टाळटाळ केल्याने
२) कालावधीत माहिती न दिल्याने
३)

१) श्री देवाराम तारजी परिहार यांनी पुणे म.न.पा. रु हद्दीतील सर्व्हे नं. १५९/१६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतमधील झोपडी किंवा दुकान विक्री घेतले तसा पूर्वी झोपडी असलेबाबत च्या ठिकाणातील झोपडी क्रमांक व पूर्वी कुणा मालकाचे नावे असलेबाबत ची माहिती मिळणेबाबत.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतमधील श्री देवाराम परिहार यांनी झोपडी किंवा दुकान विकत घेतले असलेबाबत ट्रान्सफर करणेसाठी म.न.पाला दिलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रती मिळणे.

(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतमध्ये श्री देवाराम परिहार यांनी झोपडी किंवा पूर्वीच्या दुकान पूर्वीच्या दुकान मालकाकडून विकत घेऊन ट्रान्सफर केल्यानंतर पुणे म.न.पा ने ट्रान्सफर ~~करणाकरीता~~ फी सेवाशुल्क घेतलेल्या रक्कमेच्या पावती छायांकितप्रत व म.न.पाने ~~अपीलकाराची स्वाक्षरी~~ झोपडी किंवा दुकान पुन्हामालकाकडून विकत दिल्याचे ले आऊट कागदपत्रांची छायांकित प्रती मिळणेबाबत.

ठिकाण : पुणे
दि. : १७-१०-२०१८

पुणे महानगरपालिका
औंध-बाणेर सहा. आयुक्त कार्यालय
आवक क्र. बां.औ.क्षे.का./ ७३८०
दिनांक: १७/१०/२०१८
संकलन: माहिती अधिकार.

रमेश बाबोबा ठोसर

अपील अर्जासोबत कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जोडत आहे. सहा.आयुक्त

१) रेशनकार्ड पिवळे झेरॉक्स प्रत
२) स्वयंसाक्षांकित अर्ज

Scanned by CamScanner

माहितीचा अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त
औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका
फोन - 020-25597100
जा.क्र. ७६७५
दिनांक - 10/12/2018

अपिल सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज

दिनांक - 7/12/2018 वेळ - दुपारी 12.30 वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
महाराजा सयाजीराव गायकवाड, उद्योग भवन, दुसरा मजला, औंध, पुणे

श्री. रमेश बाळोबा ठोसर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत
औंध, पुणे - 411 007
फोन - 9822490657 } अपिलार्थी

श्री. विरेंद्र केळकर
उप अभियंता
औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका } जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता

माहिती अधिकार 2005 चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री. रमेश ठोसर (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक 26/6/2018 रोजी चा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक 26/6/2018 रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाद्वारे अपिलार्थी यांनी स.नं 159/160 डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत, औंध मधील देवराम ताराजी परिहार यांनी झोपडी किंवा दुकान विकत घेतल्याबाबतची माहिती मिळणेबाबत अर्ज दाखल केला होता.

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील				
अर्जाचा दिनांक	अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक	माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक	अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक	विलंब दिवस
26/6/2018	26/6/2018	26/7/2018	16/7/2018	00

Scanned by CamScanner

अपिलार्थी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने/कालावधीत माहिती न दिल्याने दिनांक 17/10/2018 रोजी प्रथम अपिल अर्ज इकडील कार्यालयाकडे सादर केला होता.

अपिल अर्जाचा दिनांक	अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक	अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक
17/10/2018	17/10/201/	अपिल अर्ज मुदतीनंतरचा आहे

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक 14/11/2018 रोजी दुपारी 12.30 वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती परंतू सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित राहिले होते. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक 30/11/2018 रोजी सदरील सुनावणीबाबतचे पत्र उशीरा मिळाल्याने सदर दिनांकास उपस्थित राहू शकलो नाही तरी मला सुनावणी करिता पुन्हा एकदा तारीख देण्यात यावी अशी विनंती अपिलीय अधिकारी यांचेकडे केली.

त्या अनुषंगाने वरील अपिल अर्जावर दिनांक 7/12/2018 रोजी दुपारी 12.30 वा. पुन्हा सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदरील सुनावणी अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे समोर घेण्यात आली. सदर सुनावणीस अपिलार्थी स्वतः उपस्थित होते. तसेच उप अभियंता श्री. विरेंद्र केळकर, कनिष्ठ अभियंता श्री. सैय्यद हबीब, झोनिपू विभागाकडील लिपिक टंकलेखक श्री. संतोष करोते, बिगारी श्री. सचिन सुतार तसेच माहिती अधिकार लेखनिक श्री. प्रशांत जगताप हे उपस्थित होते.

सदर विषयावर अपिलार्थी यांच्या प्रश्नाचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले

अपिलकर्ता यांनी त्यांचे मूळ माहितीचे अधिकार अंतर्गत अर्जात नमूद केलेली माहितीचे अनुषंगाने सदरची माहिती उपलब्ध करुन देणेविषयी विंनंती केली

यावर उप अभियंता तसेच झोनिपू विभागाकडील सेवकांनी सदर माहितीच्या अभिलेख्याचा शोध घेतला असता माहिती उपलब्ध होत नसलेबाबत सांगितले

<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले आदेश</u>

- **अपिलार्थी यांना त्यांचे माहिती अधिकारातील अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने पुन्हा एकदा अभिलेख्याचा शोध घेऊन अपिलार्थी यांना सात दिवसात माहिती देण्यात यावी.**
- **सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.**
- **या निर्णयावर अपिलार्थीचे समाधान झाले नसेल तर या निर्णयाविरुध्द अपिलार्थी यांना मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनसमोर, पुणे - 411 001 येथे 90 दिवसात दुसरे अपिल करु शकता.**

(संदीप कदम)
अपील अधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त
औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका

प्रत -

१. श्री. रमेश बाळोबा ठोसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत, औंध, पुणे - 411 007

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव

१. श्री. विरेंद्र केळकर, उप अभियंता, औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका
२. श्री. सैय्यद हबीब, कनिष्ठ अभियंता, औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका
3. श्री. संतोष करोते, लिपिक टंकलेखक, औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका

Scanned by CamScanner